# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २८९-२२** **दिनांक ३०/०९/२०२२**

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करणा-या प्रवाशांचे मोबाईल फोन जबरीने चोरी करणा-या सराईत गुन्हेगारांना पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ऑटोरिक्षा व मोटारसायकलने प्रवास करणा-या प्रवाशांचे मोबाईल जबरीने चोरी करणाच्या घटना गेल्या काही दिवसांपासुन घडत होत्या. त्या अनुषंगाने सदर घटनांना पायबंद घालणेकामी व गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार गुन्हे शाखा, कक्ष-२ वसई यांनी वेगवेगळी पथके तयार करुन जबरी चोरी झालेल्या गुन्हयांच्या घटनास्थळांना भेटी देवून तांत्रिक पुरावे हस्तगत करुन व गुप्त बातमीदाराकरवी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीत ईसम नामे १) ऊझेर शाहीद अन्सारी वय २१ वर्षे रा. वायफाय हॉटेलचे समोरील चाळ, आयुबी चौक, मालेगाव, जिल्हा- नाशिक २) सलमान हारुन अन्सारी रा. सोफिया अपार्टमेंट, रुम नं ४०७, रज्जाक कंपाऊंड, कारोली रोड, भिवंडी ३) उसैर फुरकान अन्सारी वय २२ वर्ष रा. औचित पाडा, नाशिक रोड भिवंडी यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे केलेल्या चौकशीत वालीव पोलीस ठाणे आणि पेल्हार पोलीस ठाणेस दाखल जबरी चोरीच्या खालील १३ गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

| अक्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | २८४/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| २. | वालीव | ३१२/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ३. | वालीव | ३२४/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ४. | वालीव | ४४३/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ५. | वालीव | ५२१/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ६. | वालीव | ५७४/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ७. | वालीव | ५९६/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ८. | वालीव | ८८२/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ९. | वालीव | ८८७/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| १०. | पेल्हार | २०४/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ११. | पेल्हार | ४४१/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| १२. | पेल्हार | ४८०/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| १३. | पेल्हार | ६६९/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |

नमुद आरोपीतांकडुन गुन्हयातील विविध कंपन्यांचे मोबाईल व गुन्हयात वापरण्यात आलेली मोटार सायकल असा एकुण २,०८,४९०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अती कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा-२ वसई

युनीटचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/ रमेश भोसले, पो.हवा./९५०२१ मंगेश चव्हाण, पोहवा/९६०३६ संजय नवले, पो.हवा./०३०४९ महेश पागधरे, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/ ०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./ ०५०३३ जगदीश गोवारी, पोना/ ०६१०७ रमेश आलदर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, पो कॉ/१२०४७ दादा आडके, पो कॉ/१२०५३ सुधीर नरळे यांनी केली आहे.




**----0000----**